नियमित दिवाणी मुकदमा क्र.११४/२०१२
निशाण क्र. १२३ लगत

प्रतिवादी क्र. २ तर्फे उलटतपास नाही.

**उलट तपास वादी यांचा प्रतिवादी क्र. १,३,७,१२,२३,२४ तर्फे विधिज्ञ श्री. ए.ए.गोगटे, यांचेमार्फत सुरु–**

९. हे म्हणणे खरे आहे की, दावा माझ्या सांगण्याप्रमाणे लिहला आहे. मी मुंबईला २० वर्षे राहत आहे. मी मुंबईला मिल कामगार होतो. मी १९७६ पासून मुंबई येथे मिल कामगार म्हणून काम करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, ४२ वर्षापूर्वी मी मिल कामगार म्हणून मुंबईला गेलो. माझ्या भावंडातले दत्ताराम तुकाराम घाडी हे सर्वात मोठे आहेत. ते मुंबईत राहायला आहेत. दत्ताराम नंतर शांताराम आहे. तो ही मिल कामगार म्हणून मुंबईला आहे. शांताराम नंतर भास्कर हा कायमस्वरूपी गावी होता. नारींग्रे गावात माझ्या स्वतःच्या नावे असणा–या मिळकतींची मी माहिती घेतली आहे. नारिंग्रे गावातील सर्वे क्र. ४७ हिस्सा क्र. ५, सर्वे क्र. ५२ हिस्सा क्र. ० सर्वे क्र. ३८ हिस्सा क्र. १९, सर्वे क्र. ५० हिस्सा क्र. ५, सर्वे क्र. ४९ हिस्सा क्र. ६, सर्वे क्र. ४९ हिस्सा क्र. २, सर्वे क्र. ४७ हिस्सा क्र. ६ या मिळकतींचा सातबारा मी पाहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, या सर्व मिळकतींना यशवंत, भास्करचे वारस, दत्ताराम, शांताराम व वत्सला यांची नावे नमूद आहेत. या दाव्यात सर्वे क्र. ५० हिस्सा क्र. ५, आणि सर्वे क्र. ४७ हिस्सा क्र. ६ या मिळकती समाविष्ट करण्यास माझी काही अडचण नव्हती. तसे त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मला भास्कर, दत्ताराम, शांताराम भाउ व वत्सला आणि हिरा या बहिणी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांचे नाव तुकाराम देवू घाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, देवूला तुकाराम आणि भिकाजी दोन मुले होती. साक्षीदार सांगतात की, एकच मुलगा तुकाराम होता. हे म्हणणे खरे नाही की, देवूच्या वडिलांचे नाव बाबू घाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, बाबूंना देवू आणि येसू हे दोन मुले होती. हे म्हणणे खरे नाही की, येसूला रामचंद्र आणि लक्ष्मण असे दोन मुले होती. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्रला

आनंद आणि लक्ष्मणला विनायक, पुनाजी आणि किशोर मुले होती. हे म्हणणे खरे नाही की, तुकारामचे भाउ भिकाजी यांना अशोक, छबी, मंदा आणि उमा हे चार वारस होते. दुसरी बहिण हिरा दाव्यात समाविष्ट करण्यास माझी काही अडचण होती. कारण ती मयत होती. हिरा मयत आहे हे दाव्यात नमूद करण्याम माझी काही अडचण नव्हती. त्याचे कारण मला सांगता येणार नाही. या दाव्यासोबत वंशावळ देण्यास माझी काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, कैफियतीमध्ये दिलेली वंशावळ समोर येईल म्हणून मी ती वंशावळ दाव्यात देण्यास टाळली आहे.

विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.२१/०८/२०१९.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

Balkrishna Rajaram Patil

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.08.22 15:07:47 +0530